अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

# राजकीय संरक्षणात भ्रष्टाचाराची मॅरेथॉन

सरकार कोणाचेही येवो भ्रष्टाचाराची मॅरेथॉन थांबायला तयार नाही. सिंडिकेट बँकेच्या अध्यक्षांना तब्बल पन्नास लाखांची लाच घेताना पकडले जाण्याचा आरोप या मॅरेथॉनचा नवा टप्पा आहे. याचा अर्थ असा होतो की, या देशातल्या नोकरशाहीने राजकारणालादेखील स्वत:कडे गहाण ठेवले आहे. एखाद्या राष्ट्रीयकृत बँकेचा अध्यक्ष पन्नास लाख रुपयांची लाच घेण्याचे धारिष्ट्य दाखवतो. यावरून त्याला किती मोठ्या प्रमाणावर राजकीय संरक्षण असले पाहिजे, याचाही अंदाज येतो. कोळसा घोटाळ्यात गैरव्यवहाराचे आरोप असलेल्या दोन कंपन्यांना क्रेडीट लिमिट वाढवून देण्याच्या मोबदल्यात ही खंडणी दिली गेली. अर्थात सिंडिकेट बँकेचे चेअरमन आणि व्यवस्थापकीय संचालक सुधीरकुमार जैन यांच्या वतीने भोपाळमध्ये त्यांच्या नातेवाईकाने हे पन्नास लाख स्वीकारल्याचा आरोप आहे. प्रत्यक्ष जैन यांनी स्वत: ही रक्कम स्वीकारलेली नाही.त्यामुळे जैन यांच्यावरचा हा आरोप कितपत टिकेल याबद्दल शंका आहे. मात्र यासंदर्भातले सीबीआयकडे जर सबळ पुरावे असतील तर यातून जैन यांची सुटका होणे कठीण आहे. एकूणच या सगळ्या घटनाक्रमाचा आणि लाचखोरीच्या साखळीचा विचार केला तर राष्ट्रीयकृत बँकांमध्ये गेल्या काही वर्षांपासून लाचखोरीचे प्रमाण वाढलेले आहे. फक्त आपल्या अक्कलहुशारीने ही मंडळी तपास यंत्रणांच्या जाळ्यात अडकत नाहीत. परंतु त्यांची देवाणघेवाण मात्र व्यवस्थित चालू राहते. अशाच प्रकारची लाचखोरी अनेक विमा कंपन्यांमध्येही धुमाकूळ घालत आहे. यापूर्वी तर अनेक मोठ्या कंपन्यांनी सगळ्या राष्ट्रीयकृत बँकांच्या अध्यक्षांना दत्तक घेतल्यासारखी परिस्थिती होती. मोठ्या कंपन्यांनी फक्त पैशाची मागणी करण्याचा अवकाश या बँकांचे अध्यक्ष स्वत:हून बँकांच्या दारात पैसे पोहचवण्याचे काम करीत होते. इतकी घरपोच सेवा मिळाल्याचा तितकाच घरपोच मोबदला या बँक आणि विमा कंपन्यांच्या अध्यक्षांना दिला जातो. यानिमित्ताने एका गोष्टीवर पुन्हा प्रकाश पडतो तो म्हणजे भ्रष्टाचाराविरुद्ध कितीही लोकजागृती होवो, लोकपाल विधेयक येवो किंवा भ्रष्टाचाराच्याविरुद्ध नारा देऊन सत्तेवर आलेले मोदी यांचे सरकार असो. या कशाचाही परिणाम झालेला दिसत नाही. गडगंज पगार असूनही वाटेल तसा पैसा खाण्याची ही प्रवृत्ती इतक्या प्रचंड प्रमाणात का वाढली याचा मुळातूनच शोध घेतला पाहिजे.

## सरकार कोणाचेही येवो

केवळ लोकपाल विधेयक आले किंवा फार गाजावाजा केलेले नरेंद्र मोदींचे सरकार आले म्हणजे भ्रष्टाचार थांबेल अशा बालसमजूतीत राहण्याचे अजिबात कारण नाही. आज देशाला लाभलेली भ्रष्टाचाराची खिळ ही केवळ आणि केवळ राजकारण्यांच्या पैसेखाऊ वृत्तीमुळे निर्माण झालेली आहे. आपल्या जीवावर राजकारणी केवळ पाच वर्षांमध्ये अब्जावधीचा मालक होतो. पाच वर्षांतली त्याची कारकिर्द एवढा पैसा कमावते की, पुढे त्याच्या सात पिढ्यांचे त्यातून कल्याण साधले जाते. कमी शिकलेला परंतु केवळ राजकारणाच्या जोरावर खोऱ्याने पैसे ओढणारा राजकारणी जोपर्यंत सुधारत नाही, तोपर्यंत भ्रष्टाचार थांबत नाही. कारण लोकप्रतिनिधी म्हणून वावरणारे हे लोक नोकरशाहीकडून आपल्याला पाहिजे तशी कामे करून घेतात आणि त्याचा योग्य मोबदलाही या नोकरशहांच्या पदरात टाकतात. एवढेच नव्हे तर अनेक ठिकाणी राजकारणी आणि नोकरशहा यांच्या भागीदारीतला दणदणीत चालणारा हा व्यवसाय असतो. अगदी समजूनउमजून आणि टक्केवारीच्या तत्त्वावर एकमेकांना पैसे पोहचवण्याची कामे होतात. एखादा बँकेचा अध्यक्ष अशा पद्धतीने पैसे घेतो आणि तो आता पकडला गेल्यामुळे त्याची चर्चा होते. परंतु जे कधीच चर्चेत येत नाहीत. पण आपला लाचखोरीचा उद्योग चालवतात, अशांची संख्या बघितली तर लाचखोरीचा हा धंदा अब्जावधी रुपयांमध्ये रोज चालत असला पाहिजे, अशी सहज शंका येते. चार वर्षांपूर्वी विमा कंपन्यांच्या काही अध्यक्षांना यासंदर्भात पकडले गेले होते. दोन वर्षांपूर्वी रेल्वे महामंडळाच्या मुख्य पदावर वर्णी लावून घेण्याच्या रेल्वेमंत्र्यांच्या भाच्याला दहा कोटी रुपये दिले गेले होते. सार्वजनिक कंपन्यांची मोठी पदे आपल्या पदरात पाडून घेण्याकरता त्या कंपन्यांचे बडे अधिकारी मंत्र्यांची 'खुशामतगिरी' करतात. त्याचा मोबदला तर ते देतातच याशिवाय मंत्र्यांची मर्जी सांभाळणारी अनेक गैरकामेदेखील करतात. हा प्रकार इतका पसरलेला आहे की, त्याला रोखणे अत्यंत दुरापास्त म्हणावे लागेल. राजकारणाची शुद्धता आणि राजकारण्यांच्या पैसे कमावण्याच्या वृत्तीला जोपर्यंत लगाम बसत नाही, तोपर्यंत भ्रष्टाचाराची ही मॅरेथॉन शर्यत चालूच राहील. कोण जास्तीत जास्त पैसा कमावतो यासाठी ही स्पर्धा होतच राहील.

## पन्नास टक्के संपत्ती भ्रष्टाचारातच

राष्ट्रीयकृत बँकांचे अध्यक्ष अशा पद्धतीचा हायप्रोफाईल भ्रष्टाचार करतातच, त्याच्याच बरोबरीचा तोलामोलाचा भ्रष्टाचार अगदी सहकारी बँकांमध्ये आणि क्रेडीट सोसायट्यांमध्ये देखील ही भ्रष्टाचाराची सट्टेबाजी चालू राहते. कोणत्याही प्रकारचा कायद्याचा किंवा नीतीमत्तेचा धाक उरलेला नाही. वेगवेगळ्या मार्गाने आणि युक्त्याप्रयुक्त्या लढवून हे सगळे प्रकार चालू आहेत. नीतीमत्तेचा तर थांगपत्ताच राहिलेला नाही. आज देशाची जी काही संपत्ती आहे, त्यात पन्नास टक्के वाटा हा भ्रष्टाचाऱ्यांकडे आहे असे म्हणावे लागेल. तब्बल चार लाख कोटींचा काळा पैसा स्वीस बँकांमध्ये जमा होतो. त्याचा उगम अशा या भ्रष्टाचारातूनच झालेला असतो. हे असे भ्रष्टाचाराचे अभयारण्य केवळ राजकीय संरक्षणामुळेच टिकून आहे. कारण अनेक गैरकृत्यांमध्ये अडकलेल्यांना सहीसलामत बाहेर काढण्याचे काम राजकारणी करत असतात. शंभरामधल्या दोघातिघा राजकारण्यांना थोडीफार शिक्षा होते. परंतु त्यांची मुळातली सवय जात नाही. मग ते लालुप्रसाद असो किंवा झारखंडचे शिबू सोरेन असो, तामिळनाडूतले मारन किंवा ए राजा असो. किंवा पश्चिम बंगालमधल्या चिटफंडाला संरक्षण देणारे राजकारणी असोत. एवढेच कशाला आपल्या महाराष्ट्रातदेखील आदर्श इमारतीचा घोटाळा करून अनेक बँकांचे अध्यक्ष, महापालिका आयुक्त, लष्करातले अधिकारी अशा सगळ्यांना भ्रष्टाचाराच्या या गोतावळ्यात सामावून घेण्याचे काम झाले होते. परंतु अजून एकावरही शिक्षेची कारवाई झालेली नाही. भ्रष्टाचाराचा उधळलेला वारू देशाच्या सामाजिक सुव्यवस्थेचे नुकसान करीत आहे.